
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Refereed Research Journal
Issue-31, Vol-09 July to Sept. 2019



Editor
Dr.Bapu G.Gholap

11

# महाराष्ट्रातील भूमी उपयोजन व पिकपद्धती : एक अभ्यास

प्रा. डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
दिगांबरराव बिंदु महाविद्यालय भोकर, जि. नांदेड

**प्रास्ताविक**

देशाच्या आर्थिक विकासात नैसर्गिक साधनसंपत्तीचे अनन्यसाधारण महत्व आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीत जमीन, खाणी, पाणी, नद्या, समूद्र सरोवरे, पाऊस, सुर्यप्रकाश, हवा, जंगले इत्यादी गोष्टीचा समावेश होतो. ही सर्व संपत्ती आपल्याला निसर्गाकडून मिळालेली असते.त्यामुळेच तिला नैसर्गिक संपत्ती असे म्हणतात. जमीन ही एक नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. यांच्या पूर्ततेसाठी मानव जमिनीचा उपयोग करतो. म्हणून जमीन या साधनसंपत्तीला महत्व विशेष महत्व असल्यामुळे त्यामूळे जमिनीच्या योग्य वापरावर मानवाचा विकास अवलंबून असतो. जमिनीचा वापर कृषी उत्पादन, घरबांधणी, उद्योग उभारणे, रस्ते व रेल्वे इत्यादी विविध कारणासाठी करण्यात येतो. सर्वसाधारणपणे पर्वत, वाळवंट असणा-या जमिनीचा वापर कृषी उत्पादनासाठी करता येत नाही. त्यामुळे अशा जमिनीचा वापर अकृषी कारणासाठी करण्यात येतो. महाराष्ट्रातील जमिनीच्या वापरामध्ये खूप विविधता आहे. उदा. शेतीसाठी उपयुक्त जमीन, जंगलाखालील जमीन इत्यादी असे जमिनीचे शासनातर्फे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्रातील विविध कारणासाठी वापरात असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ व तिची टक्केवारी आणि शेतीसाठी उपयुक्त असलेल्या शेतजमिनीत कोणकोणती पिके घेतली जातात, म्हणजेच पिक पद्धती कशी आहे याचा सविस्तर आढावा घेण्यात आलेला आहे.

**भूमीउपयोजन (Land Utilization)**

कोणत्याही प्रदेशातील जमिनीचा वेगवेगळ्या हेतूने केला जाणारा वापर म्हणजेच भूमीउपयोजन होय. महाराष्ट्रात जमिनीचा निरनिराळ्या कारणासाठी उपयोग करण्यात येतो. महाराष्ट्राचे एकुण भौगोलीक क्षेत्रफळ 307713 चौरस किलोमिटर म्हणजेच 30771000 हेक्टर इतके आहे. त्यापैकी 307583 चौरस किलोमिटर म्हणजेच 30758300 हेक्टर भूमी उपयोजनाखाली आहे. महाराष्ट्रातील या जमिनीचा उपयोग तक्ता क्रमांक 01 मध्ये दर्शविला आहे.

**1) वनाखालील क्षेत्र :-** महाराष्ट्रातील वनाचे क्षेत्र 2000-01 मध्ये 51.50 लाख हेक्टर इतके होते. त्यात वाढ होऊन सन 2016-17 मध्ये 51.94 ला हेक्टर पर्यंत पोहोचले आहे. म्हणजेच राज्यात भूमी उपयोजनाखालील असलेल्या एकुण क्षेत्रफळाच्या केवळ 16.88 टक्के क्षेत्र वनाखाली आहे. प्रत्यक्षात हे प्रमाण 33 टक्के असावयास पाहिजे.

**2) मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र :-** मशागतीसाठी उपलब्ध नसलेल्या क्षेत्रात मानवी वसाहती, वाहतुकीचे मार्ग, जलाशय, पर्वत, डोंगर आणि टेकड्या इत्यादीचा समावेश होतो. मशागतीसाठी उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचे दोन प्रकार पडतात. अ) नापीक व मशागतीस अयोग्य जमीन आणि ब) बिगर शेती वापराखालील जमीन. मशागतीसाठी उपलब्ध नसलेल्या या दोन्ही प्रकारच्या जमीनीचे क्षेत्र 2000-01 साली 29.08 लाख हेक्टर इतके होते. ते सन 2016-17 मध्ये 34.64 लाख हेक्टर पर्यंत वाढलेले असून राज्याच्या एकुण भौगोलीक क्षेत्राच्या 11.26 टक्के इतके आहे.

**3) मशागतीखाली नसलेली जमीन (पडीत जमीन वगळून) :-** मशागतीखाली नसलेल्या जमीनीचे अ) मशागत योग्य पडीत जमीन ब) कायम कुरणे व चराऊ जमीन आणि क) किरकोळ झाडे झुडपाखालील जमीन असे तीन प्रकार पडतात. या तिनही प्रकारच्या जमिनीचे क्षेत्र मशागतीखाली नसलेले क्षेत्र म्हणुन ओळखले जाते. राज्यात या जमीनीखालील क्षेत्र 2000-01 मध्ये 24.54 लाख हेक्टर इतके होते. तर सन 2016-17 मध्ये ते 25.28 लाख हेक्टरपर्यंत वाढलेले असुन एकुण भौगोलिक क्षेत्राच्या 8.21 टक्के इतके आहे.

**4) पडीत जमीन :-** पडीत जमीन ही दोन प्रकारची असून त्यात अ) चालू पडीत आणि ब) इतर पडीत जमीनीचा समावेश होतो. जे क्षेत्र एकावर्षाकरीता पडीत असते, त्यास चालु पडीत असे म्हटले जाते. तर जे क्षेत्र एक ते पाच वर्षापर्यंत पडीत असते त्यास इतर पडीत असे संबोधले जाते. महाराष्ट्रात 2001 मध्ये चालु पडीत व इतर पडीत अशी एकुण 24.02 लाख हेक्टर जमीन पडीत होती ती सन 2016-17 मध्ये 26.58 लाख हेक्टर आहे. राज्यात पडीत जमीनीच्या क्षेत्रामध्ये वाढ झाली असुन 2016-17 मध्ये

एकुण भौगोलीक क्षेत्राच्या 8.64 टक्के इतकी पडीत जमीन आहे.

**तक्ता क्रमांक 01 : महाराष्ट्रातील जमिनीचा वापर (आकडेवारी लाख हेक्टर मध्ये)**

| अ.क्र. | तपशिल | 2000-01 | 2010-11 | 2016-17 |
|---|---|---|---|---|
| 1 | वनाखालील क्षेत्र | 51.50 | 52.16 | 51.94 |
| 2 | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | 29.08 | 31.80 | 34.64 |
| 3 | मशागतीखाली नसलेली जमीन (पडती जमीन वगळून) | 24.54 | 24.11 | 25.28 |
| 4 | पडीत जमीन | 24.02 | 25.45 | 26.58 |
| 5 | पिकाखालील क्षेत्र | | | |
| | अ) निव्वळ पिकाखालील क्षेत्र | 178.44 | 174.06 | 169.10 |
| | ब) दूबार / तिबार पिकाखालील क्षेत्र | 37.75 | 57.69 | 63.14 |
| 6 | पिकाखालील स्थूल क्षेत्र | 216.19 | 231.06 | 232.24 |
| | एकुण भौगोलिक क्षेत्र | 307.58 | 307.58 | 307.58 |

आधार माहाराष्ट्राची आर्थिक पाहणी (2017-18)

**5) पिकाखालील क्षेत्र :-** पिकाखालील क्षेत्रामध्ये अ) निव्वळ पिकाखालील क्षेत्र आणि ब) दूबार / तीबार पिकाखालील क्षेत्राचा समावेश होतो. या दोन पिकाखालील क्षेत्राचा समावेश होतो. या दोन पिकाखालील एकुण क्षेत्राला पिकाखालील स्थूल क्षेत्र असे म्हणतात. महाराष्ट्रात निव्वळ पिकाखालील क्षेत्र 2000-01 मध्ये 178.44 लाख हेक्टर इतके होते. सन 2016-17 मध्ये 169.10 लाख हेक्टर इतके झाले आहे. म्हणजेच 2000-01 ते 2016-17 या काळात निव्वळ पिकाखालील क्षेत्र 9.34 लाख हेक्टर कमी झाले असुन आजघडीला एकुण भौगोलीक क्षेत्राशी निव्वळ पिकाखालील असलेले क्षेत्र 54.97 टक्के इतके आहे. तसेच राज्यात एकापेक्षा अधिकवेळा घेतलेल्या पिकाखालील क्षेत्र 2000-01 मध्ये 37.75 लाख हेक्टर इतके होते तर सन 2016-17 मध्ये 63.14 लाख हेक्टरपर्यंत वाढले असुन ही वाढ 25.39 लाख हेक्टर इतकी आहे. गेल्या सतरा वर्षात महाराष्ट्रात जलसिंचनाच्या सुविधेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्यामूळेच दूबार तीबार पिकाखालील क्षेत्र वाढलेले आहे. सन 2016-17 मध्ये राज्यातील एकापेक्षा अधिकवेळा घेतलेल्या पिकाखालील क्षेत्र हे एकुण भौगोलिक क्षेत्राच्या 20.52 टक्के इतके आहे.

**6) पिकाखालील स्थूलक्षेत्र :-**पिकाखालील स्थूल क्षेत्र म्हणजे निव्वळ पिकाखालील क्षेत्र आणि एकापेक्षा अधिकवेळा घेतलेल्या पिकाखालील क्षेत्राची बेरीज होय. राज्यात 2000-01 मध्ये पिकाखालील स्थूल क्षेत्र 216.19 लाख हेक्टर होते तर सन 2016-17 मध्ये ते 232.24 लाख हेक्टर एवढे झाले आहे. याचाच अर्थ गेल्या सतरा वर्षात पिकाखालील स्थूल क्षेत्रात 16.05 लाख हेक्टर इतकी वाढ झाली आहे. राज्याची लोखसंख्या झपाट्याने वाढत असतांना पिकाखालील स्थूल क्षेत्र मात्र त्या गतीने वाढत नाही. त्यामूळे राज्यात अन्नधान्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. सन 2016-17 मध्ये राज्यातील पिकाखालील स्थूल क्षेत्राचे एकुण भौगोलिक क्षेत्राशी असलेले प्रमाण 75.50 टक्के इतके होते.

**पिक पद्धती (Cropping Pattern)**

शेतीक्षेत्रामध्ये पिकाची विविधता असते. विशिष्ट वेळेस विविध पिकांच्या लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या एकूण सर्व पिकांच्या लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या क्षेत्राशी जे प्रमाण असते त्याला 'पिकरचना' असे म्हणतात. पिकरचनेला 'पिकपद्धती' असेही म्हटले जाते. महाराष्ट्राच्या शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या सर्व पिकांचे सर्वसाधारणपणे अ) अन्नधान्ये पिके किंवा खाधान्ये पिके आणि ब) अन्नधान्यत्तर पिके असे वर्गीकरण केले जाते. अन्नधान्ये पिकामध्ये ज्वारी, बाजरी, गहू, तांदुळ, मका, नाचणी इत्यादी तृणधान्ये आणि उडीद, मुग, तुर, हरभरा इत्यादी कडधान्याचा समावेश होतो. अन्नधान्येत्तर पिकामध्ये भूईमुग, सोयाबीन, सुर्यफूल, करडई, तीळ, मोहरी, जवस इत्यादी गळीताची धान्ये तसेच कापूस, ऊस, तंबाखु, बटाटा, मिरची, हळद, फळे इत्यादीचा समावेश होतो. शेतीमधील ही उत्पादने विकण्यासाठीच उत्पादित केली जातात व शेतक-याला नगदी पैसा मिळवून देतात म्हणुन त्यांना 'नगदी पिके' (Cash Crop) असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील पिक रचना व त्यामध्ये काळानुसार घडून आलेले बदल याबद्दलची आकडेवारी तक्ता क्रमांक 02 मध्ये दर्शविलेली आहे.

**तक्ता क्रमांक 02 : राज्यातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र (लाख हेक्टर मध्ये)**

| अ.क्र. | पिके | 1960-61 | 1980-81 | 2000-01 | 2010-11 | 2016-17 |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) | अन्नधान्ये | | | | | |
| | ज्वारी | 62.84 | 64.19 | 50.94 | 40.60 | 36.16 |
| | बाजरी | 16.35 | 15.34 | 18.00 | 10.35 | 8.37 |
| | तांदूळ | 13.00 | 14.59 | 15.12 | 15.16 | 15.35 |
| | गहू | 9.07 | 10.63 | 7.54 | 13.07 | 12.72 |
| | इतर तृणधान्ये | 4.80 | 4.51 | 6.64 | 10.68 | 12.30 |
| | सर्व कडधान्ये | 23.49 | 27.15 | 35.57 | 40.38 | 43.58 |
| | एकूण अन्नधान्य | 129.55 | 136.91 | 133.82 | 130.23 | 128.48 |
| ब) | अन्नधान्येत्तर | | | | | |
| | सर्व तेलबिया | 18.69 | 17.80 | 25.59 | 36.26 | 44.09 |
| | कापूस | 25.00 | 25.50 | 30.77 | 39.42 | 42.12 |
| | ऊस | 1.55 | 3.19 | 6.87 | 10.41 | 6.33 |
| | इतर अन्नधान्येत्तर | 13.45 | 13.63 | 20.06 | 15.41 | 11.22 |
| | एकुण अन्नधान्येत्तर | 58.68 | 59.51 | 82.37 | 101.52 | 103.76 |
| | पिकाखालील स्थुल क्षेत्र | 188.23 | 196.42 | 216.19 | 231.75 | 232.24 |

आधार महाराष्ट्राची आर्थिक पहाणी (2017-18)

**अ) अन्नधान्ये पिके :-** अन्नधान्ने पिकामध्ये सर्व तृणधान्ये व कडधान्याचा समावेश होतो. महाराष्ट्रातील 1960-61 ते 2016-17 या कालावधीतील आकडेवाडीवर नजर टाकल्यास असे दिसू

येते की, अन्नधान्ये पिकाखालील जमीनीचे क्षेत्र दिवसेंदिवस घटत आहे. सन 1960-61 मध्ये अन्नधान्ये पिकाखालील क्षेत्र 129.55 लाख हेक्टर होते ते 2016-17 मध्ये 128.48 लाख हेक्टरपर्यंत खाली आल्यचे चित्र दिसुन येते. याच कालावधीत एकीकडे राज्यातील लोकसंख्या अडीच पटीपेक्षा जास्त प्रमाणात वाढलेली आहे तर दूसरीकडे अन्नधान्य पिकाखालील क्षेत्र घटत आहे. हे चित्र जर असेच कायम राहिले तर भविष्यात अन्नधान्याच्या टंचाईला गंभीरपणे तोंड द्यावे लागणार आहे हे निश्चित.

अन्नधान्ये पिकामध्ये ज्वारी हे महाराष्ट्रातील प्रमूख खाद्यान्ये पिक असून राज्यातील पिकरचनेमध्ये ज्वारी या पिकाला विशेष महत्व आहे. ज्वारी हे पिक खरीप व रबी या दोन्ही हंगामामध्ये घेतले जाते. त्यामुळे यापिकाखालील क्षेत्र सर्वाधिक असणे स्वाभाविक आहे. सन 1960-61 मध्ये ज्वारी पिकाखालील क्षेत्र 62.84 लाख हेक्टर होते ते 2016-17 मध्ये 36.16 लाख हेक्टरपर्यंत खाली आलेले दिसून येते. बाजरी हे दुसरे महत्वाचे अन्नधान्य पिक असुन हे पिक मध्यमप्रतीच्या जमिनीवर घेतले जाते. अगदी दुष्काळातही हे पिक येते. 1960-61 मध्ये राज्यातील बाजरी लागवडीखालील क्षेत्र 16.35 लाख हेक्टर इतके हो. 2000-01 मध्ये 18.0 लाख हेक्टरपर्यंत वाढलेले आहे. त्यानंतर मात्र यां पिकाखालील क्षेत्र घटलेले असुन 2016-17 मध्ये 8.37 लाख हेक्टर इतके होते. तांदूळ आणि गहू हे सुद्धा महाराष्ट्रातील महत्वाचे खाद्यान्ये पिक आहे. राज्यात 1960-61 मध्ये तांदुळ आणि गव्हांच्या पिकाखालील असणारे क्षेत्र अनूक्रमे 13.00 लाख हेक्टर व 9.07 लाख हेक्टर इतके होते. त्यात वाढ होऊन 2016-17 मध्ये अनूक्रमे 15.35 लाख हेक्टर व 12.72 लाख हेक्टर पर्यंत पोहचले आहे. या खाद्यान्य व्यतिरीक्त राज्यात मका, बार्ली, नाचणी, वरी, रागी यासारख्या तृणधान्याचेही उत्पादन होते. जवळपास दोन्ही हंगामात येणारी ही पिके वाढत आहेत. महाराष्ट्रात अशा पिकाखाली असणारे क्षेत्र 1960-61 मध्ये 4.80 लाख हेक्टर होते. 2016-17 मध्ये 12.30 लाख हेक्टरपर्यंत वाढलेले असून ही वाढ तिपटीच्या जवळपास आहे.

कडधान्यामध्ये तूर, हरभरा, मूग, उडीद, मसुर, चवळी, वाटाणा, मटकी इत्यादींचा समावेश होतो. कडधान्य म्हणजेच डाळी, डाळीमध्ये शरीराला पोषक अशी महत्वाची द्रव्य असुन अन्न समतोल होण्यासाठीच्या दृष्टीने या डाळी उपयुक्त आहेत. डाळीच्या धान्यासबंधात बरेच संशोधन करण्यात आले असुन त्यामुळे गुणात्मकदृष्ट्या या पिकामध्ये सुधारणा झाली आहे. राज्यात 1960-61 मध्ये सर्व प्रकारच्या कडधान्य पिकाखाली असणारे क्षेत्र 23.49 लाख हेक्टर होते त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन ते 2016-17 मध्ये 43.58 लाख हेक्टर एवढे झाले आहे.

**ब) अन्नधान्येत्तर पिके :-** अन्नधानेत्तर पिकामध्ये सर्व प्रकारच्या तेलबिया, कापूस, ऊस, तंबखू बटाटा, मिरची, भाजीपाला, तसेच आंबा, केळी, द्राक्षे, काजू, संत्री, मोसंबी, डाळींब, चिकू, पेरु, लिंबू, स्टॉबेरी इत्यादी फळबागाच्या उत्पादनाचा समावेश होतो. या सर्व पिकाचे उत्पादन प्रामुख्याने विकण्यासाठीच घेतले जात असल्यामुळे या पिकाला 'नगदी पिके' असे संबोधले जाते. महाराष्ट्रात 1960-61 मध्ये अन्नधान्येत्तर पिकाखाली असणारे जमिनीचे क्षेत्र 58.68 लाख हेक्टर होते. त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन 2016-17 मध्ये 103.76 लाख हेक्टर इतके झालेले असून ही वाढ जवळपास दुप्पट इतकी आहे. राज्यात एकीकडे अन्नधान्ये पिकाचे क्षेत्र सातत्याने घटत आहे. तर दुसरीकडे अन्नधान्येत्तर पिकाचे क्षेत्र सातत्याने वाढत आहे. याचाच अर्थ महाराष्ट्रातील शेतकरी नगदी पिकाकडे वळलेला असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात नगदी पिकामध्ये कापसाला प्राधान्य दिले जाते. कापूस उत्पादनात देशात गुजरात नंतर महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्राच्या पठ्ठारावरील भौगोलिक परिस्थिती कापासाठी अनूकूल असल्यामूळे विदर्भ मराठवाडा आणि खानदेशात मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड केली जाते. राज्यात विविध जातीच्या कापसाचे उत्पादन घेतले जात असून 1960-61 मध्ये या पिकाखालील क्षेत्र 25 लाख हेक्टर होते. त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन 2016-17 मध्ये ते 42.12 लाख हेक्टरवर पोहोचले आहे. ऊस देखील महाराष्ट्रातील एक महत्वाचे नगदी पिक असून सध्या ऊसाच्या लागवडीचे प्रमाण वाढले आह. राज्यात कोकण वगळता जवळ-जवळ सर्वत्र ऊसाचे पिक घेतले जात असले तरी ऊस उत्पादनाच्या दृष्टीने पश्चिम महाराष्ट्र हा महत्वाचा व अग्रेसर प्रदेश आहे. राज्यात 1960-61 मध्ये ऊसाखालील लागवडीचे क्षेत्र केवळ 1.55 लाख हेक्टर इतके होते ते 2016-17 मध्ये 6.33 लाख हेक्टरपर्यंत वाढले असल्याचे दिसून येते.

**पिकाखालील स्थूल क्षेत्र :-** गेल्या सत्तावन्न वर्षात राज्यातील अन्नधान्ये पिकाच्या क्षेत्रात घट व अन्नधान्येत्तर पिकाच्या क्षेत्रात वाढ तसेच एकुण पिकाखालील क्षेत्रात देखील वाढ होत गेली आहे. राज्यात 1960-61 मध्ये पिकाखालील स्थूलक्षेत्र 188.23 लाख हेक्टर होते. त्यात सतत वाढ होऊन 2016-17 मध्ये 232.24 लाख हेक्टर इतकी झाली आहे. राज्यातील लोकसंख्या वाढीच्या

तुलनेत पिकाखालील स्थूल क्षेत्रात झालेली ही वाढ फारच अल्प आहे.

**सारांश :-**

कृषीभूमी उपयोजनामध्ये निव्वळ पिकाखालील क्षेत्र, पडीत आणि मशागतीखाली नसलेली जमीन (पडीत जमीन वगळुन) यांचा समावेश होतो. आजघडीला महाराष्ट्रात निव्वळ पिकाखालील क्षेत्र 54.97 टक्के, पडीत जमीन 8.64 टक्के आणि मशागतीखाली नसलेलेली जमीन 8.21 टक्के इतकी आहे. पडीत आणि मशागतीखाली नसलेली जमीन यांचा समावेश संभाव्य कृषीखालील क्षेत्रात केला जातो. त्यामुळे महाराष्ट्रातील एकुण भौगोलिक क्षेत्राच्या 76 टक्के क्षेत्र कृषीभूमी उपयोजनास योग्य आहे. परंतु प्रत्यक्षात 54.97 टक्के जमीन शेतीखाली आहे. म्हणजेच अद्याप 19.64 टक्के जमीन शेतीखाली आलेली नाही. राज्यातील वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी ही जमीन उपयोगात आणणे नितांत गरजेचे आहे. गेल्या सत्तावन्न वर्षात राज्यातील अन्नधान्ये पिकाच्या क्षेत्रात घट व अन्नधान्येत्तर पिकाच्या क्षेत्रात वाढ तसेच एकुण पिकाखालील क्षेत्रात देखील वाढ होत गेली आहे. काही काळापूर्वी राज्यतील शेती ही 'जीवन जगण्याची पद्धती' होती. हरीतक्रांतीनंतर राज्यातील शेतीमध्ये सर्व पिकांच्या उत्पादनामध्ये शेतीच्या उत्पादनकतेमध्ये आणि शेतक-यांच्या उत्पन्नामध्ये वाढ तर झालीच त्याशिवाय राज्यातील शेतकज्यांच्या विचारसरणीमध्ये व दृष्टीकोणातही अमूलाग्र बदल घडून आला आहे. आता बहुतेक शेतकरी बाजारपेठेवर नजर ठेवुन किंमतीचा वियार करुन अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याच्या प्रेरणेने पिकांची निवड करु लागले ही महत्वाची उपलब्धी आहे. त्यामुळे पिकांची रचना निरनिराळ्या प्रदेशामध्ये वेगवेगळे असणे ही अत्यंत स्वाभाविक मानले जाते. नजीकच्या भविष्यकाळात राज्याच्या पिकरचनेमध्ये आणखी काही बदल होण्याची शक्यता आहे. यानंतर सरकारचे प्रोत्साहन व सहाय्य, शेतकज्यांचे साहस व प्रयत्न आणि बाजारपेठेमध्ये उपभोक्त्यांचा प्रतिसाद ह्या गोष्टी एकत्रित आल्यास फळबागाच्या पिकाच्या लागवडीखाली असलेल्या क्षेत्रामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. याकरीता फळावर प्रक्रीया करणारे कारखाने व शितगृहे मोठ्या प्रमाणावर स्थापन व्हायला हवेत. शिवाय जलद व स्वस्त वाहतुकीच्या साधनांची सोय आवश्यक आहे. शेतक-यांना त्यांनी घेतलेल्या मालाची योग्य किंमत मिळवण्यासाठी आणि फळांची विदेशात निर्यात करण्याची कार्यक्षम व्यवस्था अंमलात आणली पाहीजे. भविष्यकाळात प्रत्येक मोठ्या शहराजवळ फुलाची शेती विकसित करण्यासाठी भरपुर वाव राहील. शेतक-यांना स्वस्त पतपुरवठा करण्यात आला व शेतक-यांना त्यांच्या परिश्रमांची योग्य किंमत प्राप्त झाली तरच शेतकरी ह्या क्षेत्रामध्ये गुंतवणुक करण्याचा विचार करील. राज्यात शेतीच्या क्षेत्रामध्ये उद्योजकांचा एक नवीन वर्ग निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची :-**

1) डॉ. प्रभाकर देशमुख (2006), भारतीय अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स नागपुर.

2) पी.आर. कुलकर्णी (1999) भारतीय अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

3) माधव बिरासदार (2018) महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद

4) महाराष्ट्राची आर्थीक पहाणी 2018-19 अर्थ व सांख्यीकीय संचानलाय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई

5) Maharashtra Development Report, Planning Commission Government of India Academic Foundation New Delhi.

❑❑❑